आमचे क्वारंटाईन - श्रीकांत राऊत

आज मंगळवार २१ एप्रिल २०२०
1.

बहारीन ते मुंबई प्रवासाला आज बरोबर एक महिना लोटला. २१ मार्च २०२० रोजी दुपारी २.४० च्या सुमाराला बहारिनच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण झाल्यापासून ते मुंबईच्या विमानतळावर रात्री ८.१५ च्या सुमारास आगमन होईपर्यंत व पुढचे पाच दिवस हॉस्पिटल, हॉटेल, क्वारंटाईन साठी ज्या दिव्यातून पार पडावे लागले, व त्याचा आयुष्यात प्रथम आलेला अनुभव हा साक्षात चक्षुसमोर उभा ठाकला. प्रत्येकाला आपल्या आयुष्यात काही अविस्मरणीय क्षण येतात त्यांतील हा एक आहे असे मी मानतो.

मुंबईच्या विमानळावर आगमन झाल्यापासून पुढचे पाच दिवस सरकारी पाहुणचार व त्यानंतरचे उर्वरित नऊ दिवसांचा म्हणजे ४ एप्रिल २०२० पर्यंतचा होम क्वारंटाईन होईपर्यंत ज्या प्रसंगाला तोंड द्यावे लागले ते आठवले म्हणजे आम्हा उभयतांच्या (मी व पत्नी) आज पुन्हा अंगावर शहारे येतात. हे सारे अनुभव तुम्ही लिहून काढा आणि आम्हाला वाचावयास द्या अशी बऱ्याच आप्तस्वकीयांकडून फर्माईश झाली. काही प्रमाणात पूर्तता करता आली तर प्रयत्न करून पाहावा असे मनाशी ठरवले. ह्यात कोठेही अतिशयोक्ती नाही. जसे घडले तेच लिहिले आहे व तसेच साक्षात तुमच्या समोर मांडण्याचे धाडस म्हणा किंवा ‘पुढच्यास ठेच मागचा शहाणा’ ह्या म्हणीची प्रचिती समजा.

२३ जानेवारी २०२० ते २१ मार्च २०२० हा आमचा बहारीन मधला वास्तव्याचा काळ. साधारण १५ फेब्रुवारी २०२० पर्यंत तेथील वास्तव्य सुखासमाधानात चालले होते. २५ फेब्रुवारी २०२० ला तिथे करोना ह्या विषाणूची प्रथम लागण झाली व हळूहळू त्याचा प्रादुर्भाव वाढू लागला. सर्व शैक्षणिक संस्था बंद केल्या गेल्या व तेथील प्रशासनाने निर्बंध घालण्यास सुरुवात केली. विमानतळावर बाहेरून येणाऱ्या प्रवाशांची तपासणी सुरु झाली. संशयितांची हॉस्पिटल क्वारंटाईन मध्ये सोय करण्यात येऊ लागली. आमच्या परतीच्या विमानप्रवासाची तारीख २२ मार्च २०२० होती. आम्हाला वाटले २० मार्च पर्यंत सर्व काही आलबेल होईल कारण
२.
तोपर्यंत भारतात करोनाची लागण झाली नव्हती. मार्च उजाडेपर्यंत आम्ही खुशीत होतो. परंतु मार्च च्या पहिल्या दुसऱ्या आठवड्यात भारतात करोनाने शिरकाव केला व विषाणूचा प्रादुर्भाव वाढू लागला. पंतप्रधान मोदींनी २२ मार्च पासून लॉक-डाऊन ची घोषणा केली. आंतरराष्ट्रीय विमाने २२ मार्च पासून बंद केली. पुण्यामध्ये विषाणूने चांगलाच जोर पकडला होता. मुंबई मध्ये तेवढा नव्हता.

मुंबईचे नातेवाईक भारतातल्या परिस्थितीची माहिती वारंवार देत राहिले. शक्यतो भारतात एवढ्यात परत येऊ नका, तेथेच मुक्काम वाढावा वगैरे सूचना ते करत होते. बहारीन मधली परिस्तिथी पण वाईट होत चालली होती. आमची परिस्थिती ‘इकडे आड तिकडे विहीर' अशी द्विधा होत चाललेली. तशात आमचा व्हिसा संपत आलेला व माझी औषधे जी २ महिन्यांसाठी भारतातून घेऊन गेलो होतो ती संपत आलेली. अशा परिस्थितित विमान तिकीट pre-pone करून जर २१ मार्चला मिळाले तर बघावे. आमच्या सुदैवाने ते मिळाले. परंतु रात्री १०.३० ऐवजी दुपारी २.१५ चे मिळाले. मंदार व प्रीती शेवटपर्यंत म्हणजे विमानतळावर पोहोचवण्यास आले असताना सांगत होते की तुम्ही आता सुद्धा ठरवू शकता जायचे का नाही ते. आपण आता सुद्धा post-pone करू शकतो. परंतु आमचा निर्णय ठाम होता. एकदा आपल्या देशात जाऊन पडू. काय व्हायचे असेल ते तेथेच होऊन जाऊ दे.

आमच्या गल्फ एअर फ्लाईट क्रमांक ००६४ चा विमान प्रकार होता B 787. दुपारी २.१५ चे विमान उड्डाण शेवटी दुपारी

२.४५ पर्यंत लांबले. विमानतळावर गर्दी पुष्कळ होती. आम्हाला अंदाज होताच की हे मुंबई साठी बहारीनहुन जाणारे शेवटचेच विमान असल्याने तुडुंब गर्दीने विमान खचाखच भरलेले असेल. परंतु विमानात पाय ठेवताच आश्चर्याचा धक्काच बसला. विमानात आम्ही जेमतेम पन्नासच्या आतच प्रवासी होतो. विमान कंपनीने आयत्या वेळी B 787 प्रकारचे विमान एवढ्यासाठीच निवडले होते की social distancing चे पालन व्हावे. प्रत्येक रांगेत एकाच प्रवासी बसावा ह्यासाठी त्यांनी मुद्दामून हा विमान प्रकार निवडला होता. आम्ही मनोमन गल्फ एअर चे आभार मानले. अर्धा तास उड्डाणास विलंब होऊन देखील वैमानिकाने परिश्रमांची शर्थ करून मुंबई विमानतळावर

३.

रात्री ८.१५ ला वेळेत उतरवले. विमानात असताना आम्हाला प्रत्येकी दोन self declaration चे फॉर्म्स दिले गेले ते हातात धरूनच आम्ही विमानातून उतरलो व इमिग्रेशन च्या दिशेने मार्गस्थ झालो. मनात देवाचा धावा चालू होता आणि समाधान हे होते की फॉर्ममध्ये विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे निगेटिव्ह तर होतीच व करोना बाधित देशांच्या यादीत बहारीन चे नाव नव्हते.

———————————————

क्वारंटाईन - एक अविस्मरणीय अनुभव

———————————————

इमिग्रेशन च्या वाटेवरच मेडिकल टीमचे दोन काउंटर उभे लावले होते. आमच्या काउंटर च्या रांगेत आम्ही पुढे होतो. आम्ही आमचे दोन्ही फॉर्म त्यांना दिले. थर्मो गनने त्यांनी आमच्या कपाळाचे तापमान बघितले. ते नॉर्मल होते. त्यांनी फॉर्म वाचला. काही जुजबी प्रश्न विचारले व म्हणाले तुम्हाला होम क्वारंटाईनसाठी (चौदा दिवस) पाठवितो. देवाचे आभार मानत आम्ही पुढे निघणार तोच बाजूच्या काउंटरवरची बाई आडवी आली व म्हणाली ‘आज सर्वांनाच विशेषतः साठीचे वरचे लोक व लहान मुले ह्यांना होम क्वारंटाईन नाही. सर्वांनाच हॉस्पिटल क्वारंटाईन करण्याचे वरून आदेश आहेत. तेथेही एकसूत्रता नव्हती. काहींच्या हातावर होम क्वारंटाईन चे शिक्के मारून झाले होते. त्यांना हॉस्पिटल क्वारंटाईन मध्ये जाण्यास सांगितले. आमच्या हातावर कोणताच शिक्का मारला नव्हता. आमच्या फॉर्मवर चौदा दिवसांचा हॉस्पिटल क्वारंटाईन चा शिक्का मारून आम्हाला इमिग्रेशन कडे जाण्यास सांगितले. सर्वत्र गोंधळाचे वातावरण होते. इमिग्रेशन ऑफिसर ने आमच्या पासपोर्ट वर Arrival चा शिक्का मारला व त्याच्या मागे येण्यास सांगितले. आमचे पासपोर्ट त्याने घेऊन ठेवले होते. त्याने आम्हास तेथील collector ऑफिस मध्ये नेऊन त्यांच्या ताब्यात आमचे पासपोर्ट व आम्हास हवाली केले व तो निघून गेला. आम्हाला बाहेरील खुर्च्यांवर बसविण्यात आले व गल्फ एअर जी आमची विमान कंपनी होती त्याच्या अधिकाऱ्यास पाचारण केले. अर्ध्या पाऊण तासात ती स्वारी उगवली. आमच्या मागे इतर अनेक ज्येष्ठ नागरिक व लहान मुले यांची गर्दी झाली. बसायला खुर्च्या कमी पडल्या. काही लोक बिचारे उभे होते. एकच कोलाहल सुरु होता. कोणाला काय करावे हे सुचत नव्हते. कुठे तरी कुठली तरी यंत्रणा कमी पडते आहे असे वारंवार जाणवत होते. ह्या साऱ्या गोंधळात दोन अडीच तास कसे निघून गेले ते कळलेच नाही. रात्रीचे पाऊणे अकरा वाजले होते. पोटात भूक कोकलत होती. औषधे घेण्याची वेळ टाळून गेली होती. परंतु तेथून सुटका होण्याची कोणतीच लक्षणे दिसत नव्हती.

४.

सर्व आंतरराष्ट्रीय विमाने येण्याचा तो शेवटचा दिवस होता. भरपूर उड्डाणे येत होती तशी प्रवाशांची संख्या वाढतच होती. कदाचित विमानतळावरील कलेक्टर कार्यालय आणि इमिग्रेशन यंत्रणा ह्यांना नक्की किती प्रवासी येतील ह्याचा अंदाज न आल्याने ती यंत्रणा कोलमडून पडल्याचे स्पष्टपणे दिसत होते. विमानतळाचे स्वरूप जाऊन त्याचे स्वरूप ऐन गर्दीच्या वेळेच्या रेल्वे प्लॅटफॉर्मचे भासत होते. शेवटी रात्री अकरा वाजता कलेक्टर कार्यालयातून आमची सुटका झाली. आमचे पासपोर्ट आमच्या ताब्यात देण्यात आले व आम्हाला गल्फ एअर च्या अधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्यात आले. त्याने प्रथम आम्हाला आमचे सामान मिळवून दिले व ते घेऊन विमानतळाबाहेर ज्या त्यांनी व्यवस्था केलेल्या बसेस उभ्या होत्या, त्यांत

बसवून दिले. संपूर्ण २५ आसनी बस मध्ये आम्ही दोघेच होतो. बस सेव्हन हिल्स हॉस्पिटल, मरोळ, अंधेरी (पूर्व) च्या दिशेने मार्गस्थ झाली. क्वारंटाईन चा पहिला अंक सुरु झाला.

मोकाट रस्ते व वाहनांचा शुकशुकाट ह्यामुळे आम्ही बारा ते पंधरा मिनिटांतच सेवन हिल्स हॉस्पिटलच्या मुख्य दरवाज्यात प्रवेश केला. आमचे सामान आम्हालाच उतरवावे लागले. त्यावर जंतुनाशक औषधांची फवारणी केली गेली व ते बाजूला ठेवले गेले. नंतर आम्ही मेडिकल टीम नं १ ला भेटलो. त्यांनी आमची मेडिकल history विचारून घेतली. आमच्या कडून फॉर्म घेतले, त्यावर सही घेतली व आम्हाला सामान उचलण्यासाठी दोन मदतनीस दिले व मेडिकल टीम नं २ ला भेटण्यास सांगितले. मेडिकल टीम नं २ ही आलेल्या प्रवाशांना त्या हॉस्पिटल मध्ये दाखल करून घेण्यासाठीच्या ज्या चाचण्या कराव्या लागतात व केस पेपर्स बनवितात त्यासाठी होती. तेथे आमचे ब्लड प्रेशर, वजन चाचण्या घेतल्या व दाखल होण्यासाठी ८ व्या मजल्यावर जाण्यास सांगितले. नशिबाने मदतनीस होते व जाण्यासाठी लिफ्ट होती. संपूर्ण आठवा मजला हा फक्त क्वारंटाईन पेशंटसाठी राखीव ठेवला गेला होता. तेथे अनेक वॉर्ड होते. बहुतेक सर्व वॉर्ड मध्ये पेशंटची गर्दी दिसून येत होती. विमानतळावर उतरलेल्या सर्व ज्येष्ठांना व लहान मुलांना त्यांच्या आई बाबांसोबत पकडून पकडून तेथे आणले जात होते. त्यातच त्या हॉस्पिटल मध्ये डागडुजीचे काम चालू होते त्यामुळे सर्वत्र सिमेंट व धुळीचे थर जमिनीवर दिसून येत होते. त्यांनाही एवढ्या पेशंटची गर्दी आज होईल अशी कल्पना नव्हती. त्यामुळे तेथील यंत्रणा देखील कोलमडली असल्याचे स्पष्ट जाणवत होते. तशात आमच्या दुर्दैवाचा फेरा अद्याप संपला नसल्याचे जाणवत होते. आमची फरफट ह्या वॉर्ड मधून त्या वॉर्ड मध्ये चालूच होती कारण आम्हा उभयतांना दोन शेजारी शेजारी

५.

खाटांची सोय होत नव्हती. एक जण ह्या वॉर्डमध्ये झोपा, दुसऱ्याला दुसऱ्या वॉर्ड मध्ये सोय करतो अशी सूचना आली. आम्ही दोघांनीही ती मान्य केली नाही. आम्ही स्पष्ट सांगितले, शेजारी शेजारी खाटा असतील तरच आम्ही राहू कारण आमच्या सामानातच आमच्या दोघांचे कपडे आहेत. शेवटी बरीच फरफट होऊन ८ व्या मजल्यावर वॉर्ड नं १५ मध्ये ८३७६ आणि ८३७७ अशा दोन जवळ जवळ खाटांवर आमची सोय झाली होती. घड्याळात वाजले होते रात्रीचे साडेबारा. पोटात कावळे ओरडत होते. आमच्या जवळ येतांना जे काही खाण्यासाठी बरोबर घेतले होते ते खाऊंन घेतले. औषधे घेतली. विमानप्रवासाचा, विमानतळावर झालेल्या प्रकारचा व हॉस्पिटल मध्ये झालेल्या फरफटीचा इतका विलक्षण क्षीण आला होता की खाटेवर पडल्या पडल्याच डोळे मिटले खरे.... पण क्षणभरच. तोच थोड्याच वेळात वॉर्ड बाहेर मोठा कोलाहल, गलका, भांडण व बाचाबाचीचा प्रसंग अनुभवाला आला.

तो काय प्रकार आहे ह्याची उत्सुकता लागली म्हणून बाहेर बघायला येणार इतक्यात आमच्या खोलीत शिल्लक असलेल्या इतर दोन खतांवर एक ज्येष्ठ नागरिकांचे जोडपे आले. बोलण्यावरून ते बहुतेक अमेरिकेहून आल्याचे जाणवले. खोलीची व्यवस्था व संडास बाथरूम ची व्यवस्था बघताच त्यांचा थयथयाट चालू झाला. तेथील परिचारिका आणि वॉर्डबॉय ह्यांच्याशी त्यांनी हुज्जत घातली. आम्ही येथे राहणार नाही वगैरे वगैरे. बाहेर व्हरांड्यात कोलाहल वाढत चाललेला ते बघण्यासाठी मी बाहेर आलो तेथे १५-२० ज्येष्ठ नागरिक व महिलांनी गोंधळ मांडलेला होता. काहींना जागा पसंत नव्हती, काही जोडप्यांची सोय एकाच खोलीत न होऊ शकल्याने तर काही जोडप्यांना खोल्या न मिळाल्याने त्यांनी ठिय्या आंदोलन सुरु केले होते. ते पोलीस अधिकारी व सुरक्षा अधिकाऱ्यांशी वाद घालत होते. शेवटी पोलीस अधिकाऱ्याने तेथील मेडिकल इन चार्ज ला बोलावून घेतले. तो आल्यानंतर गलबला आणखीनच वाढला. कोणीच माघार घेई ना. ज्येष्ठ नागरिक आपल्या वयाची सबब सांगत तेथे राहण्यास नाखूष होते. शेवटी त्यातून तोडगा असा निघाला की ज्यांना येथे राहायचे नसेल त्यांची सोय सरकारने आधीच ठरवलेल्या पाच हॉटेलमध्ये करता येईल. मात्र तेथील राहण्याचा व नाश्ता-जेवण्याचा खर्च ज्यांनी त्यांनी आपल्या पदरातून

६.
करावा. नेण्याची व्यवस्था सेवन हिल्स हॉस्पिटल तर्फे करण्यात येईल. मात्र तेथे ज्या मजल्यावर क्वारंटाईन ची सोया केली असेल त्याच मजल्यावर राहता येईल. जाण्यासाठी लिफ्टचा वापर करता येणार नाही. जेवण नाश्ता वगैरे खोलीच्या बाहेर ठेवले जाईल. हॉटेलतर्फे रूम सर्व्हिस मिळणार नाही. देखरेख करण्यासाठी डॉक्टर मंडळी काही ठराविक वेळेत तेथे येऊन रुग्णांची तपासणी करतील, रुग्णांचे तपासणीचे नमुने घेतील. ह्या सर्व अटींची पूर्तता करणाऱ्यांची रवानगी हॉटेल मध्ये झाली तेव्हा वेळ झाली होती रात्रीचे दोन. आमच्या खोलीत जे युगल आले होते त्यांची रवानगी सुद्धा हॉटेल मध्ये झाल्याने जाताना समाधान पावले होते.

सेवन हिल्स संबंधी येथे थोडे लिहिले पाहिजे. सेवन हिल्स हे मुंबईच्या प्रख्यात हॉस्पिटलपैकी एक होते. परंतु गेली चार वर्षे ते बंद होते. करोनाचा प्रादुर्भाव मुंबईत वाढू लागल्याने मुंबई महानगरपालिकेने येथे आठव्या मजल्यावर करोना संशयित रुग्णांची तपासणी करण्याकरिता हे ताब्यात घेतले कारण हे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अगदी जवळ होते. डॉक्टर्स, परिचारिका व इतर कर्मचारी वर्ग येथे तैनात होता. परंतु वॉर्ड मधील खोल्या तापपुरत्या कापडी पडद्यांनी बनविण्यात आल्या होत्या. स्वच्छतागृहांची सोय मात्र तेवढीशी चांगली नव्हती. कॉमन स्वच्छतागृहे असल्याने, शिवाय काही ठिकाणी टाईल्स फुटलेल्या, वरून पाण्याची गळती असा त्रास होता. सुदैवाने येथे एक नमूद केले पाहिजे की एवढ्या संशयित रुग्णांपैकी एकही रुग्ण करोनाबाधित नव्हता; कारण 'थ्रोट स्वाब' टेस्ट नंतर जर रिपोर्ट पॉजिटीव्ह आला तर त्याला ताबडतोब येथून कस्तुरबा रुग्णालयात नेण्यात येई. परंतु पहिल्याच रात्री एकंदरीत जो अनुभव आला व येथील स्वच्छतागृहांची दुर्दशा पाहून मनात विचार आला की येताना आम्ही करोनाबाधित नसू पण येथे अशा परिस्थितीत क्वारंटाईन वास्तव्य केले तर या वातावरणाने आम्ही करोनाबाधित होऊ व पुढचे दुर्दैवाचे दशावतार कस्तुरबा रुग्णालयात जाऊन काढण्यापेक्षा स्वतः पदरमोड करून लवकरात लवकर येथून सुटका करून हॉटेल वास्तव्यास जावे अशी मनाने खूणगाठ बांधली.

७.
शनिवार २२ मार्च २०२०
आज पासून येथे क्वारंटाईनच्या दिवासाची सुरुवात. सकाळी ८ वाजता नाश्ता चहा, सडे अकरा वाजता जेवण, दुपारी ३ वाजता चहा बिस्किटे व रात्री ८ वाजता जेवण. नाश्ता जेवणाची सोय उत्तम होती. संध्याकाळी ५.३० वाजता डॉक्टर तपासणीसाठी आले. फॉर्म भरून घेतले व दोघांची पहिली 'स्वाब टेस्ट' घेतली. मोठा आऽऽ करून आ आ बोलण्यास सांगतात व बोलता बोलता घशातून लाळेचे सॅम्पल घेतात.

रविवार २३ मार्च २०२०
दुपारी ३ च्या सुमारास डॉक्टरांचे पथक आले. तपासणी केली (B.P. इत्यादी) व दुसरी 'थ्रोट स्वाब टेस्ट' साठी सॅम्पल घेतले. त्यांना आम्ही आमच्या पहिल्या टेस्टच्या रिपोर्ट विषयी विचारले तर म्हणाले दोन्ही टेस्टचा रिपोर्ट एकत्रच येईल. परंतु काळजी करू नका. पहिला निगेटिव्ह असेल म्हणूनच दुसरे सॅम्पल घेतले आहे. पहिला जर पॉजिटीव्ह असता तर तर तुम्हाला येथून 'कस्तुरबा' मध्ये हलवण्यात आले असते.

येथून शक्यतो लवकर बाहेर पडण्याच्या मानाने बांधलेल्या खूणगाठीच्या दृष्टीने माझे प्रयत्न चालूच होते. प्रीती बहारीनहून प्रयत्न करीतच होती. मला दोन तीन हॉटेल मधून नकारघंटा मिळाली होती (जागा उपलबद्ध नसल्याने). शेवटी प्रीतीच्या प्रयत्नांना यश आले. तिने व्हॉटस ऍप वर J.W. Marriott च्या श्री अशोक कदम ह्यांच्याशी संपर्क साधून आमचे जाण्याचे २४ मार्च ला जाण्याचे निश्चित केले. त्याप्रमाणे आम्हाला कळविले व केस पेपर्स तयार ठेवण्यास सांगितले.

८.
शनिवार २२ मार्च २०२०

सकाळपासून चिंतीत होतो कारण बहारीनहून निघताना माझ्या कडील काही औषधे संपत आलेली. आणखी एक दोन दिवस पुरतील एवढीच औषधे शिल्लक होती. सेव्हन हिल्स हॉस्पिटल मधून मिळण्याची शक्यता धूसर होत चाललेली. बहारीनला जाण्याआधी मी काही औषधे गोराईच्या 'श्री जनसेवा औषधी केंद्र' (जेनेरिक मेडिकल स्टोअर) मधून घेतली होती. त्यांचा मोबाईल नंबर मी माझ्या मोबाईल मध्ये स्टोअर केला होता त्याची मला आठवण झाली. ज्यांचे दुकान होते ते श्री. नितीन झोपेंशी माझी काही खास ओळख नव्हती. त्यांना फोन करून माझी अडचण सांगितली आणि लवकरात लवकर पंधरा दिवसांसाठी मला औषधांची नितांत आवश्यकता आहे असे सांगितल्यावर त्यांच्यातला माणूस जागा झाला. त्यांनी मला धीर दिला व कोणती औषधे पाहिजेत, किती पाहिजेत, सेवन हिल्स हॉस्पिटलचा वॉर्ड नंबर व बेड नंबर व्हॉटस ऍप वर पाठवून देण्यास सांगितले. इतकेच नव्हे तर अशा परिस्थितीत मला काही पैशांची आवश्यकता असेल तर पाठवून देऊ का अशी देखील विचारणा केली. मला ओशाळल्यासारखे झाले. अशी माणुसकी असणारी माणसे विरळच. त्यांनी मला सांगितले की औषधांच्या किमतीची चिंता करू नका. तुम्ही discharge घेऊन आल्यावर सावकाश द्या. मी त्यांना धन्यवाद देत सांगितले की तुम्ही डिलिव्हरी बॉय बरोबर बिल पाठवा. सध्या माझ्याकडे पैशांची चिंता नव्हती.

दीड दोन तासांतच त्यांचा माणूस माझी औषधे घेऊन आला, मात्र त्याला वरती येऊ दिले नाही. खालच्या वैद्यकीय पथकाने आमच्या वॉर्ड बॉय ला खाली बोलावून घेतले. वॉर्ड बॉय ने मला औषधे आणून दिली. त्यांनी दिलेल्या बिलाप्रमाणे मी औषधांची रक्कम वॉर्ड बॉय मार्फत डिलिव्हरी बॉय पर्यंत पोचती केली.

९.

आज रात्री वॉर्डच्या व्हरांड्यात फेऱ्या मारताना माझे B.A.R.C. मधील सहयोगी श्री. भटिजा यांची भेट झाली. तो ऑस्ट्रलियामध्ये मुलीकडे १५ दिवस राहून आला होता व त्याचीही येथेच वर्णी लागली होती मात्र त्याचा वॉर्ड वेगळा होता. जेव्हा समदुःखिंची आपसात भेट होते तेव्हा समाधान मिळतेच आणि जवळीक निर्माण होते.

सोमवार २४ मार्च २०२०

रात्री शांत झोप लागल्याने पहाटेच जाग आली. तीच मुळी नवीन हुरुपाने. आजचा दिवस काहीतरी नवीन बदल घेऊन येणार त्या आशेने. सर्व दिनचर्या आटोपून वाट बघत होतो वॉर्ड परिचारिकेची. तिची भेट होताच तिला व्हाट्स ऍप मेसेज दाखविला व आमची. J.W. Mariott ला शिफ्टिंग करण्याचे सूतोवाच केले. मेसेज वाचून तिने शिफ्टिंग संबंधी सर्व बाबी लगेच सुरु केल्या व पेपर्स तयार करण्यासंबंधी वरिष्ठांशी बोलली. आम्ही सामानाची आवराआवर सुरु केली. घड्याळात पहिले. जवळ जवळ सडे अकरा वाजले होते. तेवढ्यात जेवणाच्या ट्रॉलीचा आवाज आला व विचार केला की आता येथून जेवूनच जाणे इष्ट. आमच्या शेजारच्या खाटेवर दुबईहून आलेले मी. सीमन हे ख्रिश्चन पती पत्नीचे जोडपे होते. दोघांनीही आपापले मोबाईल नं टिपून घेतले.

दुपारी ३ च्या सुमारास आमचे J.W. Mariott हॉटेल ला आगमन झाले. तेथील तैनात असलेल्या डॉक्टरांच्या ताब्यात आम्ही आमचे पेपर्स सुपूर्द केले. त्यांनी नोंदणी करून आम्हास हॉटेल व्यवस्थापनाकडे सुपूर्द केले. डेबिट कार्डाने दोन दिवस (२४ व २५ मार्च) राहण्या-जेवणाची आगाऊ रक्कम भरून टाकली. आमची सोय ४थ्या मजल्यावरील रूम नं ११७७ मध्ये करण्यात आली. तेथे संपूर्ण वॉर्ड म्हणजे संपूर्ण ४था मजला हा क्वारंटाईन साठी राखून ठेवला होता. संपूर्ण ४ माजले चढून जावे लागले कारण लिफ्ट वापरण्यास आम्हा रुग्णांना मनाई होती. आमचे जड सामान मात्र त्यांच्या माणसाकडून खोलीच्या दारापर्यंत पोचवण्याची व्यवस्था त्यांनी केली हे तसे आमच्यासाठी भाग्यच म्हणायचे.

१०.

'वाऱ्यावरची वरात' च्या दुसऱ्या अंकाचा येथे शेवट झाला. पहिला अंक विमानतळ ते सेवन हिल्स आधीच संपला होता खोलीत प्रवेश केला. चोख व्यवस्था बघून हुश्श म्हटले आणि समाधानाचा सुस्कारा सोडला.

हे तारांकित हॉटेल असल्याने खोल्यांची सजावट, मऊ नरम गाद्या, टी व्ही, फ्रीज ची व्यवस्था, चहा करण्यासाठी इलेक्ट्रिक केटल, चहा कॉफी ची सॅशे, अंघोळीला बाथ टब व बाथ शॉवर अशी उत्तम व्यवस्था होती. आम्ही उभयतांनी मस्त गरमागरम पाण्याने शॉवर खाली अंघोळ करून मऊ गाद्यांवर झकास ताणून दिली. झोपून उठल्यावर गेले तीन दिवस झोपेविना काढलेल्या सेवन हिल्स मधील वास्तव्याची मनात गर्दी दाटून आली. त्या खाटा, ते वॉर्ड, तेथील स्वच्छतागृहे आठवली व आपण सहीसलामत बाहेर पडलो ह्या बद्दल दत्तगुरूंचे स्मरण करून आभार मानले. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'काळे पाणी' वाचताना जी मनाची चलबिचल झाली होती आणि प्रत्यक्ष अंदमानला गेल्यावर आम्ही उभयतांनी सावरकरांना ज्या खोलीत ठेवले होते त्या खोलीचे प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर तिच्या पुढे नतमस्तक होऊन साश्रू नयनांनी त्यांना कशी आदरांजली वाहिली होती ते सारे आठवले. आमच्या अल्पमतीनुसार आमची देखील आज त्या काळ्या कोठडीतून सुटका झाल्यासारखेच जाणवले व नकळत पुन्हा त्या महापुरुषाची आठवण होऊन नतमस्तक झालो.

मंगळवार २५ मार्च २०२०
येथील वास्तव्य अति आरामदायि होते. सकाळी ६.३० ला जाग आल्यावर रोजचा प्राणायाम, ब्रह्मविद्येचा सराव व इतर व्यायाम करून स्वतःच चहा बनवून घेणे. नाश्ता कॉम्प्लिमेंटरी असल्याने ९ वाजता खोलीबाहेर जाऊन पार्सल घ्यायचो. दुपारी १२ वाजता जेवणाची ऑर्डर इंटरकॉम वरून द्यायची. मधल्या काळात अंघोळी झाल्यावर खोलीबाहेरच्या लांबलचक व्हरांड्यात मॉर्निंग वॉक घ्यायचा. मग टी व्ही सीरिअल, बातम्या बघायच्या. दुपारचे जेवण झाल्यावर तासभर वामकुक्षी मग संध्याकाळी पुन्हा इव्हनिंग वॉक व रात्री ९ वाजता जेवण असा

११.
रोजचा दिनक्रम असायचा. आंतरराष्ट्रीय व अंतर्देशीय विमानांची वर्दळ नसल्याने समोरच दिसत असलेला विमानतळ व परिसरात शुकशुकाट जाणवत होता. सर्वत्र स्मशानकळा असल्याचे दिसत होते. मनात नको नको त्या शंका येत होत्या. पुढे काय हा प्रश्न भेडसावत होता. आपल्या दोन्ही टेस्टचे रिपोर्ट काय येतील? समजा पॉजिटीव्ह आले तर आपले काय? कस्तुरबा रुग्णालयात भरती केल्यावर काय होईल? आपण ह्यातून जगू ना? आपल्या मुलाबाळांची, नातलगांची भेट होईल ना? ह्या सर्वांचा भडीमार मनात सतत चालेलला असायचा. मन दिवसेंदिवस बेचैन होत होते. डोळ्यांसमोर अंधार दिसत होता. पण म्हणतात ना 'भगवान के घर देर है, अंधेर नही है' अशीच एक सुखद घटना संध्याकाळी ५ च्या सुमारास घडून आली. आमच्या मजल्यावरती माझा खोली नं ११७७ होता म्हणजे आम्ही येथे क्वारंटाईन झालेले शेवटचे रुग्ण. त्यानंतरचे खोली क्रमांक बंदच होते. माझी संध्याकाळी walk घेण्याची वेळ ५ वाजताची असल्याने मी खोली बाहेर आलो. व्हरांड्यात काही जमाव तोंडाला मास्क लावून social distancing चे पालन करीत दिसला. त्यांच्या बोलण्यावरून असे समजले की सायंकाळी साडेसहाच्या दरम्यान हॉटेल च्या तळमजल्यावर असलेल्या वैद्यकीय पथकाकडून त्यांना दूरध्वनीद्वारे सांगण्यात आले की बहुतेकांचे रिपोर्ट निगेटिव्ह आले होते व त्यामुळे त्यांना हॉटेल मधून सेवन हिल्स ला नेण्यासाठी वाहतुकीची सोय करण्यात आली होती. सामान खोलीबाहेर काढून ठेवण्यास सांगण्यात आले होते. हॉटेलचे देणे भरण्यास सांगण्यात आले व सर्वांना संध्याकाळी ६ वाजता खाली जमण्यास सांगण्यात आले. मी लगेच वैद्यकीय पथकाशी आमच्या रिपोर्टविषयी चौकशीही केली. परंतु तो आला नसल्याचे सांगण्यात आले. मन जरा खट्टू झाले, पण क्षणभरच. कारण त्या मंडळीत काही जोडपी वयाने आमच्यापेक्षा अधिक असल्याने आम्हाला विश्वास वाटू लागला की आमचा रिपोर्ट पण निगेटिव्ह येणार. ताप, सर्दी, खोकला अशी आम्हाला कोणतीच लक्षणे नसल्याने आमच्या डोळ्यांसमोर आशेचा एक किरण चमकून गेला. लवकरच आपण देखील आपल्या घरी 'होम क्वारंटाईन' साठी जाणार याचा मनोमनी हर्ष झाला.

बुधवार २६ मार्च २०२०
दुपारचा चहा घेऊन छान गप्पा मारत बसलो होतो. इव्हनिंग वॉक ला निघणार इतक्यात आमच्या

१२.
इंटरकॉम ची बेल वाजली. पलीकडचा आवाज तळमजल्यावरील वैद्यकीय पथकाचा होता. 'तुम्हा दोघांचे दोन्ही टेस्ट रिपोर्ट निगेटिव्ह' आल्याची शुभवार्ता दिली गेली. बरोबर ६ वाजता सामानासहित खाली येण्याची व हॉटेल चेक आऊट करण्याची सूचना दिली गेली. साडे सहाच्या दरम्यान सेवन हिल्स ला जाणारी बस येईल तेव्हा तयार रहा. आमचा आनंद गगनात मावेना. कालच थोडी पुसट कल्पना आल्याने आम्ही सामानाच्या बॅगा आधीच भरून ठेवलेल्या. त्या लिफ्ट जवळ नेऊन ठेवल्या. व्यवस्थित तयार होऊन, खोली आवरून खाली आलो. हॉटेल चेक आऊट केले. २६ तारखेच्या राहण्याचे भाडे घेतले नाही परंतु जेवणाचे बिल भरून टाकले. वैद्यकीय पथकाकडून पेपर्स घेतले. डिस्चार्ज पेपर्स वर सह्या केल्या. आमच्यासारखे इतर ५-६ जण त्यांचा रिपोर्ट निगेटिव्ह आल्याने खाली येऊन वाट पाहत होते. त्यांच्या पैकी एक जोडपे जे अमेरिकेहून २१ मार्चच्या रात्री आमच्या शेजारील खाटेवर आले होते व भांडून येथे आले होते त्यांना पाहताक्षणीच आम्ही ओळखले. त्यांची कुरकुर सुरूच होती की त्यांच्या जड सामानाच्या बॅगा त्यांना स्वतःच उचलून आणाव्या लागल्या, हॉटेल management ने त्यांना मदत केली नाही, वगैरे वगैरे. आम्ही मनात देवाचे आभार मनात होतो की येताना व जाताना दोन्ही वेळेला आमचे जड सामान हॉटेल च्या पोरांनीच आणून बहुमोल मदत केली होती कारण आमच्या बोलण्यात मार्दव होते. म्हणतात ना 'अति शहाणा त्याचा बैल रिकामा'. त्यांचे प्रत्येक बोलणे हे कठोर व माजोरीचे जाणवत होते. साडेसहाला सेवन हिल्स ला नेण्यासाठी मिनीबस आली व आमच्या क्वारंटाईन चा तिसरा व अंतिम अंक सुरु झाला.

सेवन हिल्स च्या वाटेवर असताना बस थांबत थांबत जात होती कारण वाटेवरच्या एक दोन हॉटेलमध्ये वास्तव्यास असणाऱ्या रुग्णांना (ज्यांचे रिपोर्ट निगेटिव्ह आले होते) घेऊन जेव्हा मुक्कामावर पोहोचलो तेव्हा घड्याळात संध्याकाळचे सात सव्वासात होऊन गेले होते. तेथे पोहोचल्यावर तळमजल्यावर वैद्यकीय पथकाला सामोरे गेलो. आमच्या सारखे नॉर्मल रिपोर्ट आलेले आणखी बरेचसे रुग्ण तेथे आधीच येऊन बसलेले होते. सर्वांसाठी एकाच काउंटर असल्याने लवकर सुटका होण्याची चिह्ने दिसत नव्हती. प्रत्येकाच्या रांगेतील नंबराप्रमाणे
१३.
काउंटरवर बोलावले जात होते व त्यांना डिस्चार्ज पेपर्स देऊन त्यांच्या हातावर 'home quanratine' चा शिक्का मारला जात होता व पेपर्स वर देखील तारखेसहित (किती दिवस पुढचे घरातच राहायचे आहे) शिक्का मारला जात होता. तो पेपर पुन्हा वैद्यकीय अधिकाऱ्याकडे अंतिम सहीसाठी पाठविला जात होता. सर्वांना खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था होती कारण रात्रीचे आत वाजत आले होते. जेवणाची ताटे, ताक व खायला केळी दिली जात होती. आम्हाला खाण्याची इच्छा नव्हती म्हणून ताक व केळे खाऊन भागविले. साडेआठच्या सुमारास आमचा नंबर आला. काउंटरवर गेलो. हातावर स्टॅम्प मारला. २१ मार्च पासून पुढचे चौदा दिवस म्हणजे ४ एप्रिल २०२० पर्यंत होम क्वारंटाईनचा स्टॅम्प आमच्या डाव्या हातावर व पेपर्स वर मारण्यात आले. वाटले, चला आता सुटका झाली. परंतु दुर्दैव अद्याप पाठ सोडायला तयार नव्हते. अंतिम सहीसाठी ज्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडे पेपर्स गेले तो नेमका जेवायला गेला होता. तेथे आणखी काही काळ थांबणे नशिबी आले. पश्चिम उपनगरांची जी BEST ची बस देण्यात आली होती ती भरल्यामुळे सोडून देण्यात आली. आता तो अधिकारी जेऊन येईपर्यंत थांबणे क्रमप्राप्त झाले. अर्ध्या-पाऊण तासाने तो आल्यानंतर एकदा डिस्चार्ज पेपर्स हातात पडले खरे, पण वाहतूक करणाऱ्या अधिकाराने सांगितले, थोडे थांबा. तुम्ही दोघेच उरला आहात पश्चिम उपनगरात जाणारे. तुमच्यासाठी वेगळी मिनीबस पाठवण्याची व्यवस्था करतो. बाहेर आलो. मुख्य दरवाज्यावर पोलीस व सुरक्षा अधिकाऱ्यांनी आमचे पासपोर्ट व पेपर्स तपासले. हातात ते धरलेल्या अवस्थेत आमचे फोटो त्यांनी त्यांच्या मोबाईल मध्ये काढून घेतले. आमच्या सह्या त्यांच्या डिस्चार्ज रजिस्टर मध्ये घेतल्या. आमचे बाहेर असलेले सामान त्यांनी बसमध्ये चढवण्यास मदत केली. एकदा सुटकेचा समाधानाचा सुस्कारा सोडत बरोबर रात्री १०.३० वाजता BEST च्या मिनीबस ने आमच्या घराकडे प्रस्थान केले. बसमध्ये आम्ही दोघे व बस ड्रायवर इतकेच असल्याने आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळाला. रात्री ११ च्या सुमारास सोसायटी मेन गेट वर ड्रायवर ने बस थांबवली. त्याचे आभार मानले व हातावर बक्षिसी म्हणून शंभराची नोट त्याला दिली. एकतर घरापर्यंत बस आणली आणि जड सामान उतरवण्यास मदत केली.

घरात शिरल्याबरोबर दोघांनी प्रथम गरमागरम पाण्याने स्नान केले व गरम दुधात हळद, मध घालून यथेच्छ प्राशन केले व घरी पोहोचल्याचा निःश्वास सोडला. दुधाची व्यवस्था आमच्या शेजाऱ्यांनी आधीच करून ठेवली होती त्यामुळे बरे झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी ऑफिस मध्ये बोलावून घेतले व काही दिवसांपूर्वी आमच्या

विषयी चौकशी करण्यासाठी पोलीस येऊन गेल्याचे सांगितले. मी त्यांना सांगितले की पोलिसांना विमानतळाच्या अधिकाऱ्यांकडूनच कळविले जाते व क्वारंटाईन विषयी रुग्णाची माहिती दिली जाते.त्या प्रमाणे ते हॉस्पिटल किंवा घरी येऊन रुग्णाविषयी माहिती घेत असतात. तो त्यांचा रूटीन भाग असतो. आम्ही आमचे डिस्चार्ज पेपर्स त्यांना दाखविले व आमच्या दोन्ही टेस्ट निगेटिव्ह आल्याने आम्हाला होम क्वारंटाईन उर्वरित नऊ दिवसांसाठी घरीच करावे लागेल त्यांनी आम्हाला संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तुम्ही घराबाहेर पडू नका, ज्या वस्तूंची आवश्यकता असेल त्या आम्ही पुरवण्याची व्यवस्था करू वगैरे वगैरे. आमचे शेजारी श्री. गिरप साहेब ह्यांनी आमच्या ह्या होम क्वारंटाईन च्या काळात आम्हाला बहुमोल मदत केली. रोज फोन वर विचारणा करून ज्या जीवनावश्यक वस्तूंची आवश्यकता असते, जसे भाजीपाला, फळे, दूध व किराणा माल आणून देण्याची उत्तम व्यवस्था केली. वास्तविक मी असे बऱ्याच जणांकडून ऐकले होते की होम क्वारंटाईन केलेल्या लोकांशी सोसायटीमधील इतर रहिवासी अक्षरशः वाळीत टाकल्यासारखे व्यवहार करतात. Society Distancing करतात. त्यांच्याशी बोलणे (Social Distancing ठेऊन) तर दूरच, पण फोनवर सुद्धा बोलणे टाळतात. परंतु श्री. गिरप, माझे ज्येष्ठ नागरिक कट्ट्याचे सहकारी श्री. पतंगे व श्रीयुत मांजलकर हे मात्र ह्यास अपवाद ठरले. त्यांनी केलेलं उपकार आम्ही विसरणे शक्यच नाही. क्वारंटाईन च्या वास्तव्यात रोज फोन करून तब्येतीची चौकशी करीत व हव्या-नको त्या वस्तूंची पूर्तता ते करीत. माणुसकीचा झरा वाहत असल्याची जिवंत प्रचिती येत होती.

आमच्या होम क्वारंटाईनच्या उर्वरित ९ दिवसांच्या काळात गोराई म्युनिसिपल, सेवन हिल्स व कस्तुरबा हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथकाकडून रोज आमच्या तब्येतीच्या चौकशीचे फोन येत असत. नक्की वास्तव्याला घरीच आहात ना? सर्दी, ताप, खोकला, श्वसनाचा त्रास वगैरे नाही ना? ह्याची चौकशी करत. एकदा तर माझे त्यांच्याशी वाजलेच. मी त्यांना सांगितले की आम्ही घरात दोघेच ज्येष्ठ नागरिक आहोत. आम्हास काही जण मदत करतात, हवे नको ह्याची विचारपूस करतात. परंतु बऱ्याच सहकारी निवासात दोघेच ज्येष्ठ नागरिक असलेल्यांना खूपच त्रास होत आहे. त्यांना कोणी मदत करीत नाही. त्यामुळे न जाणो त्यांच्या बाबतीत असे घडू नये की करोना तर बाजूला राहिला पण उपासमारीमुळे त्यांचे काही बरे वाईट झाले तर त्याला जवाबदार कोण? तुमच्याकडे

काही यंत्रणा आहे का? काही NGO वा सामाजिक संस्था Social Distancing चे नियम पाळून अशा लोकांच्या मदतीला धावून येतील का? फोन करणाऱ्या व्यक्तीने माझी तक्रार रास्त असून मी ती वरिष्ठांपर्यंत पोचविते असे सांगून माझ्या तोंडाला पाने पुसली. ५ एप्रिल नंतर नेहमी येणारे फोन बंद झाले ते कायमचेच. आमचे प्रश्न व आमच्या अडचणी आम्हालाच सोडवायला लागणार असेच त्यांना सूचित करायचे होते.

———————-
करोना व लॉक डाऊन
———————-
बहारीन च्या वास्तव्यास असतान करोना विषाणूसंबंधी बरेच वाचले होते. करोना म्हणजे मुकुट. त्या विषाणूचा आकार मुकुटाप्रमाणे असतो म्हणून त्यास हे सार्थ नाव दिले गेले. चीन मधील वूहान शहरात प्रथम त्याचा प्रादुर्भाव दिसून आला तो डिसेंबर २०१९ मध्ये. तो नवीनच होता म्हणून त्याला Novel Covid-19 असे संबोधले गेले. आता बरेच आरोप-प्रत्यारोप

होत आहेत की, चीनने वूहान शहरातील प्रयोगशाळेत त्याची निर्मिती केली वगैरे वगैरे. खरे खोटे देवच जाणे. लवकरच सत्य काय ते बाहेर येईलच. सुरुवातीला त्याच्या लक्षणांबद्दल सांगितले गेले की सर्दी, ताप, खोकला, डोकेदुखी, अंगदुखी अशी आहेत. करोना बाधित रुग्ण खोकल्यामुळे किंवा शिंकल्यामुळे त्याच्या संसर्गात कोणी व्यक्ती आल्यास, त्याला ह्या विषाणूची बाधा होते. म्हणून बाहेर पडताना तोंडाला मास्क लावून Social Distancing म्हणजे कमीत कमी १ मीटर अंतर ठेऊन चालणे व हाताला sanitizer वारंवार लावून Liquid Detergent ने वारंवार हात धुवावेत. परंतु करोनाचा विषाणू मानवी शरीरात प्रवेश कसा करतो व शरीरात गेल्यावर शरीराच्या कोणत्या भागात तो फोफावतो ह्याची शास्त्रोक्त माहिती नक्की समाजत नव्हती. कस्तुरबा हॉस्पिटलचे Corona Chief Doctor फाहिम ह्यांची व्हाट्स ऍप वर एक मुलाखत ऐकली. त्यातून बऱ्याचशा गोष्टींचा उलगडा झाला. त्यांच्याच शब्दात, "करोना विषाणू ज्या गतीने वाढतो त्याची पूर्ण माहिती येत नाही. मास्क लावणे, sanitizer वापरणे ह्या गोष्टी दुसऱ्या स्टेजपर्यंत ठीक आहेत, कारण तोवर विषाणू नियंत्रणात असतो. परंतु जर तिसऱ्या स्टेजमध्ये गेलो तर मात्र मास्क व sanitzers काम करू शकणार नाहीत. तिसरी स्टेज म्हणजे Community Viral ची स्थिती. मुळात करोना व्हायरस हा निर्जीव आहे. तो हालचाल करू शकत नाही. हा बॅक्टरीया नाही. बॅक्टरीया हा सजीव असतो व तो हालचाल करतो. म्हणून त्याला मारणे सोपे असते. ह्या करोना विषाणूच्या आतमध्ये DNA प्रोटीन असते व तो माणसाच्या शरीरात गेल्यावर activate होतो. त्याच्या बाहेरील आवरण हे Fatty Acid आहे. ते आतल्या DNA ला संरक्षण देत असते. Antibiotic ह्याला मारू शकत नाही. म्हणून त्याला De-Activate करावा लागेल. त्यासाठी बाहेरील Fatty Acid चे आवरण तोडावे लागेल. ते कशामुळे तुटते

तर अतिउष्णतेमुळे व liquid detergent soap मुळे. हे आवरण तुटल्यावर आतमधील DNA आपोआप मारून जातो. जोपर्यंत बाहेरील आवरण तुटत नाही तोपर्यंत ७२ तास हा विषाणू जिवंत राहतो. ७२ तासानंतर त्या fatty acid चे आवरण तुटून जाते वा वितळून जाते. धातू जसे चांदी, तांबे ह्यावर काही तास जिवंत असतो तर कपड्यांवर ७२ तास जिवंत असतो. त्याची डेन्सिटी चारशे मायक्रॉन (१ मिलिमीटरचा १००० वा भाग म्हणजे एक मायक्रॉन) असून वजन जास्त आहे. तो स्वतः उडू शकत नाही किंवा हवेत जाऊ शकत नाही. तो तोंडाद्वारे, नाकाद्वारे आणि कानाद्वारे शरीरात प्रवेश करतो. कसा? तर जो करोनाबाधित रुग्ण आहे त्याच्या थुंकण्यामुळे, शिंकण्यामुळे किंवा खोकल्यामुळे आपल्या शरीरात प्रवेश करतो. शिंकताना त्याने तोंडावर हात ठेवला, नंतर तोच हात काचेवर ठेवला व तेथे चुकून निरोगी माणसाच्या हाताचा स्पर्श झाला व त्याने तोच हात आपल्या तोंडाला, नाकाला, लावला तर तो निरोगी माणसाच्या तोंडात जाऊन टॉन्सिल च्या भागात जाऊन तेथे थांबतो. तो तेथे किती तास किंवा किती दिवस असतो ह्याची पूर्ण माहिती अद्याप मिळाली नाही. तेथून तो पुढे आतल्या फुफ्फुसांमध्ये ट्रान्सफर होतो व पेशींमध्ये जाऊन धडकतो. तेथे त्याचे फॅटी ऍसिड चे आवरण वितळून जाते व DNA प्रोटीन पेशीमध्ये involve होते. तेथे तत्याची वाढ होते व माणसाच्या शरीरावर त्याचा परिणाम म्हणजे श्वसनाला त्रास होतो व न्यूमोनिया उद्भवतो. परंतु तो ज्या वेळी टॉन्सिल च्या भागात असतो तेव्हा तो निर्जीव असतो. त्यामुळे त्याची वाढ होऊ शकत नाही. म्हणून दर दोन-तीन तासांनी गरम पाणी, गरम चहा पीत राहणे उत्तम. Black Tea चे लवंग दालचिनी घालून सेवन करणे चांगले. त्यामुळे तो विषाणू तेथे De-Activate होईल. घरातच राहणे सुरक्षित आहे. बाहेर जायचेच असेल तर तोंडाला हातरुमाल किंवा मास्क लावून Social Distancing हे पाळावेच लागेल. वारंवार sanitizer चा वापर व liquid detergent ने कमीत कमी २० सेकन्द हात व्यवस्थित धुणे ही सवय लावून घ्यावीच. लक्षात ठेवा, आपले घर हेच सर्वात मोठे हॉस्पिटल आहे. ह्या विषाणूंवर जगात अद्याप लसीचा शोध लागला नाही. आपल्याकडे वैद्यकीय सुविधा अत्यंत अल्प आहेत. पंच्याऐंशी हजार लोकांसाठी एक व्हेंटिलेटर उपलब्ध आहे. त्यामुळे इस्पितळात जाऊन त्या दुर्मिळ व्हेंटिलेटर वर जाऊन झोपण्यापेक्षा वर सांगितलेल्या precautions घेणे उत्तम.

डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या वूहान शहरातून प्रादुर्भाव झालेल्या ह्या विषाणूने इराण, इटली, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया, युरोप, आफ्रिका व अमेरिकेत शीघ्र वेगाने थैमान घातले व हळूहळू सर्व विश्वाला त्याच्या विळख्यात घेतले. अमेरिकेच्या

राष्ट्राध्यक्षांनी त्याला ‘China Virus‘ संबोधून चीन नेच त्यांच्या

वूहान येथील प्रयोगशाळेत निर्मिती केली आणि सुरुवातीला सत्य दडपून टाकले असा थेट आरोप केला. त्यांच्या मते चीनला सर्व जगात आर्थिक महासत्ता गाजवायची आहे म्हणून चीनने हे भ्याड दुष्कृत्य केले.

मार्च २०२० मध्ये भारतात करोनाचा सर्वप्रथम प्रादुर्भाव झाला. भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी करोनाची अचूक पावले ओळखली व सर्व राज्यांच्या सहमतीने टप्प्याटप्प्याने टाळेबंदी (लॉक-डाउन) केली. ती खालील प्रमाणे:
२२ मार्च - जनता कर्फ्यू
२४ मार्च २०२० - पहिली टाळेबंदी २१ दिवसांसाठी
१४ एप्रिल २०२० - दुसरी टाळेबंदी २१ दिवसांसाठी
४ मे २०२० - तिसरी टाळेबंदी १३ दिवसांसाठी
१७ मे २०२० ते ३१ मे २०२० - चौथी टाळेबंदी १३ दिवसांसाठी.

त्याचा सुयोग्य परिणाम दिसून आला. जगात ज्याप्रमाणे वाढीचा आणि मृत्यूचा वेग होता त्यामानाने हे प्रमाण भारतात कमी राहिले. ह्यावर यशस्वी मात करायची असेल तर मोदींनी जो कानमंत्र दिला आहे तो ‘आत्मनिर्भर' होण्याचा.

सुमारे साडेपाचशे वर्षांपूर्वी संत कबीरांनी (ई.स. १३९९-१५१९) रचना केलेल्या अनेक दोह्यांपैकी खालील चार निवडक दोह्यातून जो उपदेश केला आहे तो आताच्या करून महामारीच्या भीषण संकट घडीला निष्ठेने मुकाबला करणाऱ्या जनता व करोना योध्यांना मार्गदर्शक तर ठरेलच, शिवाय पंतप्रधान मोदींनी आत्मनिर्भरतेचा जो कानमंत्र दिला आहे तो किती यथार्थ आहे त्याची सुद्धा पुष्टी करेल.

१. कबीर गाफिल क्यों फिरै क्या सोता घनघोर. तेरे सिराने जम खडा, ज्यू अंधियारे चोर.
हे मूर्ख माणसा, तू इतका बेसावध होऊन का भटकत राहतोस आणि झोपेचे सोंग घेतल्यासारखे वागतोस. अंधाऱ्या रात्री चोर यावा, तास मृत्यू तुझ्या उशाशी उभा आहे.

२. निश्चय काल गरासही, बहुत कहा समुझाय. कहै कबीर मैं क्या कहूँ, देखत न पतियाय.
हा काळ निश्चितच सर्वग्रासी आहे. मी पुष्कळ तर्हेने समजावून सांगितले पण काय करू? दुसरे लोक नाश पावताना (बघूनही) कोणी काहीच धडा घेत नाही.

पृष्ठ १८..

३. काल फिरै, सिर उपरै, हाथों धरी कमान. कहे कबीर गहू ज्ञान को, छोड सकल अभिमान
हातात धनुष्यबाण घेऊन मृत्युरूपी काळसर्प तुमच्या डोक्यावर फिरत आहे. सगळा गर्व, अहंकार, अभिमान सोडून दे व आत्मस्वरूपाचे, आत्मनिर्भरतेचे ज्ञान ग्रहण कर.

४. हम जाने थे खायंगे, बहूत जिमिं बहू माल. ज्यो का त्यो रह गया, पकडी ले गया काल.
आम्ही समाजत होतो आमच्या जवळ भरपूर जमीन आहे, पुष्कळ धनदौलत आहे. आम्ही त्याचा भरपूर उपभोग घेऊ. परंतु ती संपत्ती जशीच्या तशी राहिली आणि काळ मात्र आम्हाला पकडून घेऊन गेला.

—————————————-

करोनाचा मानवजातीला बहुमोल संदेश
——————————————-

मी जात-पात, धर्म, उच्च-नीच, अमीर गरीब,गोरा काळा, स्त्री पुरुष, पापी पुण्यवान असा कोणताच भेदाभेद मानीत नाही. माझ्या कचाट्यात जो सापडतो त्यास मी ओढून नेतो. माझ्या विळख्यापासून जर वाचायचे असेल तर एकाच उपाय. घरी राहा, स्वस्थ राहा. ताळेबंदीचे नियम पाळा. वेळोवेळी प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करा. जसे तोंडाला मास्क लावणे, सोशल डिस्टंसिंग करणे, लिक्विड सोप ने कमीत कमी २० सेकंद वारंवार हात धुणे, sanitizer वापरणे इत्यादी. सर्वात महत्वाचे म्हणजे करोना योद्ध्यांना सहकार्य करा. लक्षात असू द्या:

‘ न करी जो नियमांचे पालन, तो अल्पजीवी ठरेल
करेल जो काटेकोर पालन, तो दीर्घायुष्य जगेल.
घरच्या घरी जो थांबेल, तो स्वस्थ होईल.
स्वयं विलगीकरण जो करेल, पुनर्जन्म त्यास लाभेल.’